१६. मुक्या प्राण्यांची कैफियत

(माणूस वनामध्ये गाई चारायला घेऊन गेला होता. गाय चरत असताना एक चिमणी उडत उडत तिच्याजवळ येते.)

चिमणी : चिव चिव चिव गं! तिकडे तू कोण गं?

गाय : अगं मी कपिला मावशी
का गं चिऊ उदास दिसशी?

चिऊ : काय सांगू गाई गाई,
छाती धडधडते पहा बाई!
काय करू सुचतच नाही!
भीती फार वाटते बाई ॥

गाय : अगं अगं चिऊताई ।
मोबाईलचा आवाज,
तुज सहन न होई ॥
तू आहेस नाजुकशी ।
आवाजाने होशी कासाविशी ॥
(गायही आपले डोळे पुसते.)

चिऊ : कपिला मावशी काय गं झाले?
तुझेसुद्‌धा डोळे का पाणावले?

गाय : काय सांगू चिऊताई!
प्लॅस्टिकचा बघ ढीग किती?
घासाबरोबर प्लॅस्टिक जाते
माझे तर पोटशूळच उठते!!

चिऊ : काय करावे, सुचत नाही
मानव शहाणा होतच नाही.

गाय : चल गं जाऊ तलावावर,
पाणी पिऊ घोटभर ।
(दोघी तलावाच्या काठावर जातात.)

मासोळी : अगं कपिला, अगं चिऊ ।
नका इथले, पाणी पिऊ ॥

चिऊ : का गं, का गं मासोळी?
तू तर राहतेस याच जळी ॥

मासोळी : अगं इथले जल विषारी ।
तगमग जीवाची होते भारी ॥
पाणी आहे घाण घाण ।
तडफडती जलचरांचे प्राण ॥

गाय : ते बघ आले नागोबा.

चिऊ : (नागोबास उद्‌देशून बोलते.)
अहो, अहो नागोबा
आज का झाले रागोबा?

नागोबा : नाही वारूळ, नाही शेती
मला पकडून, लाह्या देती!
नको नको ती अंधश्रद्‌धा
मानवा, डोळे जरा उघड आता!

गाय : (माणसाला उद्‌देशून बोलते.)
का मुक्या प्राण्यांना देता त्रास?
का जंगलांचा करता ऱ्हास?
वाघोबा मग घालतात झडप
तुम्हांलाच करतात पोटात गडप!

सर्व प्राणी : मानवा मानवा ऐक तर खरे.
वनचरे आता नच तुझे सोयरे
करत राहाशील जर प्रदूषित सारे
धरती माता देईल दूषणे
तडफडशील मग दूधाविना
तडफडशील मग अन्नाविना
तेव्हाच होईल आमचे स्मरण

जागृत होऊन राखशील पर्यावरण
पर्यावरण! पर्यावरण!
(माणूस खाली मान घालतो.)

माणूस : नका नका हो असे बोलू,
आम्ही आमचे वर्तन बदलू
पर्वत, जल, वातावरण
नाही करणार प्रदूषण ॥
सदा करीन वृक्षारोपण
हिरवेगार वनीकरण ॥
कीटक, पक्षी अन् जलचर
सगेसोयरे तुम्ही वनचर ॥

– ज्योती वैद्य – शेटे

शब्दार्थ : **कैफियत**– तक्रार. **कासावीस होणे**– व्याकूळ होणे. **डोळे पाणावणे**– दु:ख होणे, रडू येणे. **पोटशूळ उठणे**– पोट दुखणे. **जलचर**– पाण्यात राहणारे प्राणी. **डोळे उघडणे**– जागरूक होणे, सावधान होणे. **सगेसोयरे**– नातेवाईक. **ऱ्हास**– नष्ट. **दूषण देणे**– दोष देणे. **स्मरण**– आठवण. **वनचरे**– वनात राहणारे प्राणी.

स्वाध्याय

प्र. १. तक्रार व वनचर यांच्या माध्यमातून जोड्या पूर्ण करा.

	तक्रार	वनचर
(१)	मोबाईलच्या आवाजाची भीती	चिमणी
(२)	प्लॅस्टिक सेवनाने पोटदुखी	
(३)		मासोळी
(४)	वारूळ, शेत नष्ट	

प्र. २. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) या पाठात कोणाकोणांत संवाद झालेला आहे?
(आ) चिमणीला कोणता त्रास होतो?
(इ) गाईचे डोळे का पाणावले?
(ई) मासोळीने आपली कोणती समस्या मांडली आहे?
(उ) नागोबाची तक्रार कोणती आहे?

प्र. ३. घोटभर, मैलभर, तासभर, कणभर, चमचाभर हे शब्द वापरून वाक्ये लिहा.

शिक्षकांसाठी : विद्यार्थ्यांकडून या संवादपाठाचे सादरीकरण करून घ्यावे.

प्र. ४. कोण ते सांगा (वनचर, भूचर, जलचर, उभयचर)

(१) पाण्यात राहणारे– (३) जंगलात राहणारे–

(२) जमिनीवर राहणारे– (४) जमीन व पाणी या दोन्ही ठिकाणी राहणारे–

प्र. ५. खालील शब्दांचे समानार्थी शब्द पाठातून शोधून लिहा.

(१) किनारा– (३) जल– (५) मासा–

(२) शेवट– (४) आठवण– (६) नातेवाईक–

प्र. ६. खालील शब्दांचे अर्थ शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.

सगेसोयरे, पाहुणे, नातेवाईक, भाऊबंद

प्र. ७. खालील शब्दांचे लिंग बदला.

(१) चिमणी – (२) नाग – (३) वाघ –

प्र. ८. खालील वाक्यांत कंसातील योग्य वाक्प्रचार घाला.

(उदास दिसणे, कासावीस होणे, डोळे पाणावणे, डोळे उघडणे.)

(अ) सह्याद्री डोंगर चढताना आमचा जीव पाणी पिण्यासाठी .... होत होता.

(आ) आवडते पेन हरवल्याने संजय आज .... होता.

(इ) पाणीटंचाई भासू लागताच पाणी बचतीबाबत सर्वांचे .... उघडले.

(ई) रस्त्यावर घडलेला अपघात बघून सर्वांचे ....

प्र. ९. धडधड, तगमग यासारखे आणखी शब्द लिहा.

- **खालील चौकटीत काही प्राणी व काही पक्ष्यांची नावे लपलेली आहेत. ते शोधा व त्यांची नावे लिहा.**

उदा., वटवाघूळ

सिं	ह	ब	द	क	लां	का
या	त्ती	ग	स	बु	ड	ळ
का	व	ळा	सा	त	गा	वी
बि	कि	ट	मो	र	य	ट
को	टि	ग	वा	घ	गें	डा
ब्रा	ल्हा	ट	उं	घू	स	ड
जि	रा	फ	वी	ट	ळ	गा

- दवाखान्याच्या ठिकाणी लावलेल्या पाट्या वाचा. त्या पाट्यांमध्ये आपल्याला सूचना दिलेल्या असतात. या सूचनांव्यतिरिक्त आणखी काही सूचनांच्या पाट्या तुम्ही तयार करा.

दवाखाना

शांतता राखा.

स्वच्छता राखा.

रुग्णाला भेटण्याची वेळ
सकाळी : १० ते ११ वा.
संध्याकाळी : ५ ते ७ वा.

रुग्णाला भेटायला येणाऱ्यांनी गर्दी करू नये.

रुग्णाजवळ एकाच व्यक्तीने थांबावे.

- वरीलप्रमाणे शाळेच्या परिसरात स्वच्छताविषयक पाट्या लावायच्या आहेत, तर तुम्ही कोणत्या पाट्या तयार कराल.

शाळा

- **'पर्यावरण संरक्षण' याविषयी पाठाच्या शेवटी माणसाने केलेली प्रतिज्ञा तुमच्या शब्दांत लिहा.**

प्रतिज्ञा

आम्ही आमचे वर्तन बदलू.

____

____

____

- **वाचा. समजून घ्या.**

दैनिक	दररोज निघणारे, प्रकाशित होणारे
साप्ताहिक	सप्ताहातून एकदा प्रकाशित होणारे
पाक्षिक	पंधरा दिवसांतून एकदा प्रकाशित होणारे
मासिक	महिन्यांतून एकदा प्रकाशित होणारे
त्रैमासिक	तीन महिन्यांतून एकदा प्रकाशित होणारे
अर्धवार्षिक	सहा महिन्यांतून एकदा प्रकाशित होणारे
वार्षिक	वर्षातून एकदा प्रकाशित होणारे

CBBKPH

आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द पाहा.**

१. ही माझी छत्री आहे.

२. तू कोणाचा मुलगा आहेस ?

३. मी कालच गावाहून आलो.

४. जी वेगाने पळेल, ती जिंकेल.

अधोरेखित केलेले शब्द 'एकाक्षरी' शब्द आहेत. एकाक्षरी शब्दांना द्यायची वेलांटी किंवा उ-कार नेहमी दीर्घ लिहितात. या नियमाला फक्त 'नि' हा शब्द अपवाद आहे. खालील शब्दांपासून वाक्ये बनवा.

१. ती –　　२. पी –　　३. मी –　　४. ही –

- **खालील शब्द वाचा. शब्दांतील शेवटच्या अक्षराला दिलेली वेलांटी, उ-कार समजून घ्या.**

चिमणी, विळी, मिरची, कढई, चटई, सफाई, खिडकी, मागू, चिकू, पेरू, नाचू, वस्तू, गाऊ, शिंगरू, कांगारू, ताई, समई, पाहुणी, पाणी.

मराठी भाषेत शब्दांतील शेवटच्या अक्षराला द्यायची वेलांटी किंवा उ-कार नेहमी दीर्घ लिहितात. या नियमाला 'आणि', 'परंतु' हे शब्द अपवाद आहेत.